


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : १६ वा बुधवार दि. ११ फेब्रुवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये




# भ्रष्टाचाराच्या भंडाऱ्यात यथेच्छ ताव मारणाऱ्या बोथेंना भंडारी का वाचवताहेत?

## बोथेंची संपत्ती कधी करणार जप्त? डॉ. भंडारींकडून आपल्याच अहवालावर कारवाईच नाही

# कित्येक वर्षांपासून डेपोटेशन वर ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार!

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून जो काही भ्रष्टाचाराचा प्रचंड भंडारा सुरू आहे, त्या भंडाऱ्यामध्ये यथेच्छ भ्रष्टाचाराच्या मेजवानीवर ताव मारण्याचे प्रताप भांडारपाल प्रकाश बोथे यांनी केलेले आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यासंदर्भात सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करून तसेच वरिष्ठ पातळीवर प्रयत्न केले आणि त्यातूनच मग प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर बडतर्फीची कारवाई करण्यात आलेली आहे. मात्र, केवळ या कारवाईवर न थांबता चौकशी अहवालात सांगितल्याप्रमाणे प्रकाश बोथे यांची चल अचल संपत्ती जप्त करणे आवश्यक आहे. विद्यमान आरोग्य उपसंचालक (अकोला) डॉ. कमलेश भंडारी यांना विभागीय चौकशी प्रमुखाणी दोषी प्रकाश बोथेंची संपत्ती जप्त करण्याची शिफारस अहवालात केली होती, परंतु आज डॉ. भंडारी हेच बोथेंवर कारवाई करण्यात कुचराई का करीत आहेत, हे अद्यापही गुलदस्त्यात आहे. प्रकाश नामदेव बोथे हे २०१९ साली शैक्षणिक पात्रता नसतांना ही भांडारपाल झाल्यानंतर त्यांनी तेथूनच जिल्हा सामान्य रुग्णालयात भ्रष्टाचाराची अक्षरशः एक मालिका सुरू केली. असा एकही दिवस नसेल, ज्या दिवशी बोथे यांनी भ्रष्टाचार केला नसेल. प्रकाश बोथे राहणार अकोला यांनी भ्रष्टाचाराचे अनेक विक्रम या ठिकाणी प्रस्थापित केले. खरे तर बोथे यांच्यावर तेंव्हाच कारवाई होणे अपेक्षित होते, परंतु २०१९ पासून आलेल्या जिल्हा शल्यचिकित्सकांनी सातत्याने बोथेंच्या भ्रष्टाचारावार पांघरुण घालण्याचे प्रयत्न केले. परंतु भ्रष्टाचारविरोधात अविचल योद्ध्याप्रमाणे लढणाऱ्या दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने या भ्रष्टाचारावर घणाघात केला तेंव्हापासून प्रशासकीय यंत्रणा हादरायला लागली. अखेर सुमारे वर्षभरापूर्वी चौकशी समिती स्थापन झाली आणि प्रकाश बोथे यांची भयंकर अशी कृष्णकृत्ये बाहेर आली. प्रकाश नामदेव बोथे यांचा भ्रष्टाचार पाहून चौकशी समितीचे डोळे अक्षरशः विस्फारले गेले. एव्हढेच नाही तर प्रकाश बोथे हल्ली मुक्काम अकोला यांची मुजोरी आणि उर्मटपणा एव्हढा झाला होता की, त्यांनी चक्क चौकशी समितीसमोर येण्याचेही सौजन्य दाखवले नाही. यावरून हे स्पष्ट आहे की, प्रकाश बोथे हे भ्रष्टाचार करून-करून किती गेंड्याच्या कातडीचे बनले होते. चौकशी समितीने हाही निष्कर्ष मांडला होता की, प्रकाश बोथे यांनी हा जो काही बेबंद भ्रष्टाचार केलेला आहे, त्यातून त्यांनी प्रचंड प्रमाणात अवैध संपत्ती गोळा केली आहे. त्यामुळे त्यांच्यावर तात्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून त्यांची संपत्ती ही शासन दप्तरी जमा करण्यात आली. विशेष म्हणजे या चौकशी समितीत डॉ. कमलेश भंडारी हे हेही होते. त्यांनीही यासंदर्भातील निष्कर्ष मांडलेले आहेत. मात्र, आज डॉ. कमलेश भंडारी हे स्वतःच दिलेल्या अहवालातील आदेशांची अंमलबजावणी करण्यापासून पळ काढताना दिसून येत आहेत. आज प्रकाश बोथे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश देऊन तब्बल सहा महिन्यांचा काळ उलटून गेला आहे. तरीही बोथे यांच्या संपत्तीवर टाच आणण्याचे सरकारी पातळीवर प्रयत्न शून्य दिसून येत आहेत. एव्हढी चालढकल आणि बोथेंना वाचवण्याचा प्रयत्न कशासाठी होत आहे, हे अद्यापही गुलदस्त्यात आहेत. डॉ. कमलेश भंडारी अकोला उपसंचालक यांच्याशी या संदर्भात वारंवार संपर्क करण्याचा प्रयत्न केला गेला मात्र ते सातत्याने या विषयाला घेऊन टाळाटाळ करताना दिसून येत आहेत. यावरून प्रकाश बोथे यांच्याशी काही अर्थपूर्ण साटेलोटे तर झाले नाही ना, अशी शंका आता येऊ लागली आहे.

✻दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने या मुद्द्याला घेऊन लवकरच एक जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. आरोग्य विभागातील अधिकारी वरिष्ठांचे आदेश धुडकावतात, स्वतःच्याही




आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत आणि एकप्रकारे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचे काम करीत आहेत, हे मुद्दे घेऊन आता थेट न्यायालयाचे दार ठोठावले जाणार आहे.✻

राज्याच्या आरोग्य विभागासाठी अशाप्रकारे कोर्टात खेचले जाणे ही त्यांच्यासाठी खरे तर लाजीरवाणी बाब आहे. परंतु भ्रष्टाचाराचे थैमान ज्या विभागात सुरू आहे आणि निर्लज्ज अधिकारी मोठ्या पदांवर बसलेले आहेत, त्या विभागाला आता याचे किती सोयरसूतक पडते, हेच पाहणे महत्वाचे ठरणार आहे. काहीही झाले तर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज प्रकाश नामदेव बोथे राहणार अकोला यांच्यासारखी भ्रष्टाचाचाराची कीड आणि त्यांना वाचवणाऱ्या निर्लज्ज अधिकाऱ्यांवर कारवाई झाल्याशिवाय मागे हटणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# परीक्षा विद्यार्थ्यांची आहे मात्र पण धावपळ पालकांची होतय!...

## केंद्रात ३४० विद्यार्थी; बाहेर ५०० हून अधिक व्यक्ती

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

महाविद्यालयाच्या केंद्रात बारावीची परीक्षा सीसी कॅमेऱ्याची निगराणी आणि पोलिसांच्या बंदोबस्तात सुरू झाली. मात्र, परीक्षा केंद्राच्या बाहेर कॉपी पुरवण्यासाठी जमलेल्या पालक, मित्र आणि संस्था चालकांची एकच गर्दी दिसून आली. साखरखेर्डा येथे बारावीच्या परीक्षेसाठी एसईएस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय आणि कै. भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय, अशी दोन केंद्रे आहेत. विद्यार्थ्यांची वाढती संख्या आणि मागील वर्षी राजेगाव केंद्रातील गैरप्रकार यामुळे ते केंद्र बंद करण्यात आले. त्यामुळे तेथील विद्यार्थ्यांना साखरखेर्डा येथे परीक्षा द्यावी लागत आहे. ११ फेब्रुवारीपासून सुरु झालेल्या परीक्षांसाठी पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला असून, कोणत्याही गैरप्रकारास आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मात्र, पालक, मित्र आणि संस्था चालक परीक्षा केंद्राबाहेर सतत फिरत असल्याचे दिसून आले.



# शिवकीर्तनाने शिवजयंतीचा बुलढाण्यात आरंभ!

## निवृत्ती महाराज इंदुरीकर यांचे कीर्तन शुक्रवार १४ फेब्रुवारीला !



**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत व मराठी मनाची अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयंती सोहळा, बुलढाणा येत्या शुक्रवार १४ फेब्रुवारी रोजी आपल्या विनोदी शैलीने प्रबोधन करणारे महाराष्ट्रातील गाजलेले कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या जाहीर शिवकीर्तनाने आरंभ होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा यांच्यावतीने बुलढाणा शहरात प्रथमच महाराष्ट्रातील गाजलेले विनोदी कीर्तनकार हभप.निवृत्ती महाराज इंदोरीकर यांचे जाहीर शिवकीर्तन शुक्रवार १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सायंकाळी ४.३० ते ६.३० वाजेपर्यंत शिवनेरी जिजामाता प्रेक्षागार परिसर, आयडीबीआय बँक चौक बुलढाणा येथे आयोजित करण्यात आले आहे. तरी या शिवकीर्तनासाठी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, हे विनम्र शिवआवाहन आम्ही शिवप्रेमीसमस्त बुलढाणेकर व आयोजक छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा यांच्यावतीने करण्यात आले आहे

# विहीर खोलीकरणाचे पैसे पाण्यात! ग्रामपंचायतची अर्थपूर्ण डूबकी?

**जनसंचलन/लाखनवाडा**



पाण्याशिवाय जगणं कसं शक्य आहे? शिवाय आता उन्हाळ्याची चाहूल लागली असून, ग्रामस्थांची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे.दरम्यान गत दोन महिन्या पहिले लाखनवाडा ग्रामपंचायतने गावातील विहिरीचे खोलीकरण केले खरे पण पाण्याचा थेंबही उपलब्ध झाला नाही. त्यामुळे विहिर खोलीकरणाचे पैसे पाण्यात गेल्याचे दिसून येत असून, ग्रामपंचायतीने विहीरीत अर्थपूर्ण डूबकी तर मारली नाही ना असा प्रश्न उपस्थित होत आहे. दोन महिने अगोदर लाखो रुपये खर्च करून गावाला सुरळीत पाणीपुरवठा व्हावा याकरिता ग्रामपंचायतीने ग्रामपंचायतच्या मालकीची रायदर धरणाखाली असलेल्या विहिरीचं खोलीकरण करून गावाला पाणीपुरवठा व्हावा याकरिता काम करून घेतले असता आज मात्र दीड महिना उलटून गेल्यानंतर विहिर ही कोरडी झाली आहे. शासनाचे लाखो रुपये पाण्यात गेल्याचे ग्रामस्थ चर्चा करीत आहेत. याबाबत ग्राम विकास अधिकारी मोरे यांच्याशी संपर्क साधला असता मार्च अखेर जल जीवन पाणीपुरवठ्याची पाईपलाईन पूर्ण होत असून मुबलक पाणी गावाला मिळेल अशी माहिती दिली. परंतु ग्रामस्थांना पाणी किंवा उपलब्ध होईल?हा प्रश्न निर्माण झाला आहे.

# मोबाईलचा शोध आणि रेडिओचा क्रोध!

## संपादकीय लेख





सुजलाम् सुफलाम् मलयज शितलाम्; शस्य शामलाम् मातरम्, वन्दे मातरम् ! असे सकाळचे मंगल सूर आज हरवले आहे, असे वाटते. एकेकाळी रेडिओ हा आपल्या जीवनाचा एक महत्वाचा भाग मानला जात होता. कारण माहिती, संवाद आणि गाण्यांच्या माध्यमातून मनोरंजनाचे महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून रेडिओचा उपयोग केला जात होता. मात्र, आज सर्वत्र नवनवीन माध्यमे आली आणि रेडिओचा वापर कमी झाला. दरवर्षी १३ फेब्रुवारी हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. परंतु टेलिव्हिजन आणि मोबाईलचा शोध लागल्यानंतर रेडिओचा वापर कमी झाला. मात्र, आजूनही रेडिओचे महत्त्व कमी झालेले नाही. जागितक रेडिओ दिनाच्या निमित्ताने त्यासंदर्भातील संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी सादर करत आहेत... संपादक.

जगभरातील लोकांना शिक्षित करण्याबरोबरच आजपर्यंत माहितीची देवाणघेवाण आणि रेडिओने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच रेडिओ हे पत्रकारांसाठीसुद्धा एक महत्वाचे व्यासपीठ म्हणून उदयास आले आहे. रेडिओ हे माहिती पसरविण्याचे सर्वात शक्तिशाली साधन आहे. १३ फेब्रुवारी १९४५ रोजी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिल्यांदा प्रसारण झाले. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पहिला जागतिक रेडिओ दिन औपचारिकपणे २०१२मध्ये साजरा करण्यात आला होता. जागतिक रेडिओ दिन २०२२ची थीम एवोलूशन- द वर्ल्ड इज ऑलवेज चेंजिंगङ्ख होती. म्हणजेच विकासाबरोबर जगाचाही विकास होत आहे. थीम रेडिओची लवचिकता आणि टिकाऊपणा दर्शवते. याचा अर्थ जग जससजसे बदलत आहे, तसे रेडिओमध्येही नावीन्यता येत आहे. तरी आजही तो काळ आठवतो जेव्हा आपण रेडिओ ऐकून आनंदीत व्हायचो.

जागतिक रेडिओ दिवस दरवर्षी १३ फेब्रुवारी रोजी जगभरात साजरा केला जातो. या दिवशी दरवर्षी युनेस्को जगातील सर्व प्रसारक, संस्था आणि समुदायांच्या सहकार्याने विविध कार्यक्रम आयोजित करीत असतो. संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवर चर्चा करून लोकांना त्याबद्दल जागरूक केले जाते. रेडिओ ही जगभरातील माहितीची देवाणघेवाण करणारी सेवा आहे. आपत्ती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रेडिओचे महत्त्व वाढते. अशा परिस्थितीत जगभरातील तरुणांना रेडिओची गरज आणि महत्त्वाची जाणीव करून देणे, हा जागतिक रेडिओ दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. माहितीचा प्रसार करण्यासाठी रेडिओ हे सर्वात शक्तिशाली आणि स्वस्त माध्यम म्हणून ओळखले जाते. रेडिओ हे युगानुयुगे असले तरी त्याचा वापर संवादासाठी केला जात आहे. जागतिक रेडिओ दिवस कधी आणि का सुरू झाला? सन २०११ साली जागतिक रेडिओ दिनाची सुरुवात झाली. सन २०१०मध्ये स्पॅनिश रेडिओ अकादमीने प्रथमच १३ फेब्रुवारी हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. युनेस्कोच्या सदस्य देशांनी सन २०११मध्ये हा प्रस्ताव स्वीकारला आणि हा जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित केला. नंतर सन २०१२मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेनेही ते स्वीकारले. त्यानंतर त्याच वर्षी १३ फेब्रुवारी रोजी युनेस्कोने प्रथमच जागतिक रेडिओ दिवस साजरा केला. याच दिवशी जागतिक रेडिओ दिन साजरा करण्याचे एक खास कारण आहे. वास्तविक, संयुक्त राष्ट्र रेडिओ १३ फेब्रुवारी १९४६ रोजी सुरू झाला. संयुक्त राष्ट्र रेडिओच्या वर्धापनदिनानिमित्त जागतिक रेडिओ दिवस साजरा केला जाऊ लागला.

रेडिओ म्हणजे काय? रेडिओ म्हणजे एक असे यंत्र, जे विजेचा वापर करून इलेक्ट्रोमॅग्नेटिक तरंगे तयार करते, ज्यांच्या द्वारे संदेशाची देवाणघेवाण केली जाते. इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह पाठवणाऱ्या रेडिओला ट्रान्समीटर तर तरंगे म्हणजेच वेव्ह स्वीकारून त्याचे रूपांतर आवाजात करणाऱ्या रेडिओला रिसीव्हर असे म्हटले जाते. रेडिओ ३०० एचझेड इतक्या क्षमतेने इलेक्ट्रोमॅग्नेटिक वेव्ह तयार करू शकते. जगातला पहिला रोडिओ इटलीचे शास्त्रज्ञ मार्कोनी यांनी बनवला. सन १८९५मध्ये त्यांनी रेडिओचा शोध लावला आणि त्याचे पेटंटही मिळवले. मार्कोनीला फादर ऑफ रेडिओ असेही म्हणतात. इंग्रजांनी आणि अनेक युरोपीयन देशांनी हे तंत्रज्ञान आपापल्या वसाहतीत नेले. याच माध्यमातून अमेरिका, आफ्रिका, आशिया खंड आणि ऑस्ट्रेलिया असा रेडिओचा प्रसार झाला. त्या काळी हे माध्यम प्रामुख्याने कम्युनिकेशनसाठी वापरले जात होते. विशेषतः युद्धकाळात बातम्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी, अनेक खेळांच्या कॉमेंट्रीसाठी रेडिओचा वापर होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारततही ब्रिटिशांनीच रेडिओ आणाला. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबई आणि कलकत्ता येथे ऑल इंडिया रेडिओ नावाची दोन केंद्रे सुरू झाली. त्यानंतर सन १९३२मध्ये भारत सरकारने भारतीय प्रसारण सेवा नावाचा एक विभाग सुरू केला. सन १९३६मध्ये त्याचे नाव ऑल इंडिया रेडिओ- एआईआर असे ठेवण्यात आले. दरम्यान, सन १९२०चे दशक येता येता रेडिओला व्यावसायिक स्वरुप प्राप्त झाले. तसेच सन १९५०पर्यंत रेडिओ लोकप्रिय झाला होता. भारततही रेडिओची सुरुवात सन १९२०च्या दशकात झाली. दि.२३ जुलै १९२७ रोजी मुंबईतून रेडिओ प्रसारण सेवा सुरू झाली. तसेच इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी लिमिटेडने मुंबई आणि कोलकता येथे रेडिओ स्टेशन सुरू केले. परंतु सन १९३०मध्ये ही कंपनी बंद पडली. त्यानंतर सरकारने ही कंपनी आपल्या ताब्यात घेत त्याला इंडियन स्टेट ब्रॉडकास्टींग सर्विस असे नाव दिले. त्यानंतर दि.८ जून सन १९३६मध्ये त्यांचे ऑल इंडीया रेडीओ असे नामकरण करण्यात आले. तसेच सन १९५६मध्ये पुन्हा याचे नाव बदलत आकाशवाणी करण्यात आले. हळूहळू आकाशवाणीचे जाळे देशभर पसरू लागले. आज २३ भाषांमध्ये ४१५ रेडिओ स्टेशनसह ऑल इंडीया रेडीओ ही जगातल्या सर्वात मोठ्या रेडिओ प्रसारण सेवेपैकी एक बनली आहे. तसेच सन २००१मध्ये भारतात खासगी रेडिओ स्टेशनलासुद्धा सुरुवात झाली होती.

रेडिओ हे सर्वात जुने माध्यम असले तरी, संवादाचे एक महत्वाचे माध्यम म्हणून त्याच्याकडे बघितले जाते. सन १९४५मध्ये आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र संघात रेडिओचे पहिले प्रसारण झाले होते. त्यामुळे हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून साजरा केला जातो. स्पेन रेडिओ अकादमीने सन २०१०मध्ये जागतिक रेडिओ दिवस साजरा करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर केला होता. त्यानंतर युनेस्कोच्या ६७व्या सत्रात १३ फेब्रुवारी हा दिवस जागतिक रेडिओ दिवस म्हणून घोषित करण्यात आला. युनेस्कोच्या या निर्णयाला संयुक्त राष्ट्रसंघाने दि.१४ जानेवारी २०१३ रोजी मान्यता दिली. दरवर्षी युनेस्कोद्वारे जगभरातील रेडिओ प्रसारक आणि संघटनांनाच्या मदतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच संवादाचे माध्यम म्हणून रेडिओच्या भूमिकेवरसुद्धा चर्चा केली जाते. यावर्षी जागतिक रेडिओ दिवसाला रेडिओ आणि विविधता ही थीम देण्यात आली आहे. तसेच विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि संपर्क असे सबथीम सुद्धा देण्यात आले आहे.

!! समस्त श्रोत्यांना जागतिक रेडिओ दिनाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कार शिकताना नियंत्रण सुटलं, गाडीसह विहिरीत कोसळले, सख्ख्या भावांसह तिघे बुडाले, नागपुरात हळहळ..

**नागपूर:** कार शिकत असताना झालेल्या भीषण अपघातात तीन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी एमआयडीसी परिसरात सोमवारी रात्री एक धक्कादायक अपघात घडला. रात्री सुमारे ११ ते ११:३० वाजताच्या सुमारास तीन तरुण कारमध्ये जात असताना रस्त्यालगत असलेल्या कठडा नसलेल्या विहिरीत कार कोसळली. विहिरीत कार पडली आणि ती पूर्णपणे बुडून तिघेही तरुण तिथेच बुडून मृत्युमुखी पडले. या अपघातामुळे कुटुंबीय आणि स्थानिक नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. सुरज सिद्धार्थ चव्हाण (वय ३४ वर्ष राहणार बुट्टीबोरी), साजन सिद्धार्थ चव्हाण (वय २७ वर्ष हे दोघे सख्खे भाऊ) आणि त्यांचा मित्र संदीप चव्हाण (वय २७ वर्षे) असे मृतकाचे नाव असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अपघाताच्या वेळी तीन तरुण एका कारमध्ये बसले होते, त्यातील एक तरुण कार चालवणे शिकत होता. वेगात असलेल्या कारचे नियंत्रण अचानक गमावल्याने ते रस्त्यालगत असलेल्या उघड्या विहिरीत पडले. विहिरीची खोली सुमारे पंधरा फूट होती, ज्यामुळे कार आणि त्यात अडकलेले तरुण तिथेच बुडून गेले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी त्वरित बुटीबोरी पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन मदत संस्थांना कळवले. घटनास्थळी दाखल झालेल्या पोलीस आणि अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने मदत कार्य सुरू केले आणि विहिरीतून कार बाहेर काढली. परंतु, त्यावेळी तिघांचे प्राण गेले होते. या अपघाताची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर, त्यातील एक तरुण शिकवणी घेत असताना कार चालवायचा प्रयत्न करत होता, असे स्पष्ट झाले आहे. पोलीस घटनास्थळी तपास करत असून, त्यांच्याकडूनअधिक माहिती मिळवण्यासाठी तपास सुरू आहे. विहिरीच्या आसपास गॅटर किंवा कठडा नसल्यामुळे या अपघाताची शक्यता अधिकच वाढली होती. कठड्याच्या अभावामुळे वाहनाचे नियंत्रण गमावणे सुलभ होते. जेव्हा



चालकाचे लक्ष तिथेच विसरले गेले. अशा अपघातांचा पुनरागमन टाळण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी कठड्यांची उभारणी आणि अधिक सुरक्षा उपाययोजना घेण्याची आवश्यकता आहे. या धक्कादायक घटनेने मृतांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला असून, त्यांच्यावर शोककळा पसरली आहे. घटनास्थळी पोलीस अधिक तपास करत असून, अपघातामुळे भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना टाळण्यासाठी अधिक प्रभावी सुरक्षा उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# क्लासवरुन घरी आला, खोलीत भावाला त्या अवस्थेत पाहून बहिणीचा हंबरडा; बारावीच्या विद्यार्थ्याने संपवलं आयुष्य...

**सांगली :** सांगलीतील मिरजमध्ये बारावीच्या विद्यार्थ्याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. प्रथमेश बाळासाहेब बिराजदार (१८ वर्ष) असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. संबंधित विद्यार्थी हा बारावीमध्ये शिकत होता. ११ फेब्रुवारी २०२५, आजपासून बारावीची परीक्षा सुरू झाली आहे. पण याआधीच, परीक्षा सुरू होण्याआधीच प्रथमेश बिराजदार याने सोमवारी रात्री आठ वाजता राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. लेकाच्या जाण्याने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. प्रथमेशच्या आत्महत्येचे नेमके कारण समोर आले नाही. मात्र त्याने



परीक्षेच्या कारणामुळे, परीक्षेच्या तणावातून आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. प्रथमेश बिराजदार हा हुशार विद्यार्थी होता, अशी माहिती परिसरातील लोकांकडून समजते आहे. मात्र हुशार विद्यार्थी असूनही परीक्षा सुरू होण्यापूर्वीच त्याने आत्महत्या केल्याने मिरजमध्ये खळबळ उडाली आहे. या घटनेने परिसरातील नागरिकांमधून मात्र हळहळ व्यक्त होत आहे.प्रथमेश सोमवारी रात्री खाजगी अॅकॅडमीमधून मंगळवारचा, उद्याचा पेपर कसा सोडवायचा याचे लेक्चर घेऊन आला होता. त्यानंतर सोमवारी संध्याकाळी त्याच्या बहिणीसोबत गप्पा - गोष्टी करून तो पुन्हा अभ्यास करण्यासाठी दुसऱ्या खोलीमध्ये गेला होता. त्यानंतर रात्री नऊच्या सुमारास जेवण करण्यासाठी त्याची बहीण त्याला बोलवण्यासाठी त्याच्या खोलीकडे आली. त्यावेळी प्रथमेश गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. प्रथमेशने आत्महत्या केल्याचं समोर आलं. भावाला अशा लटकलेल्या अवस्थेत पाहिल्यानंतर बहिणीने एकच आक्रोश केला. त्याला तात्काळ रुग्णालयात नेण्यात आलं, मात्र तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता

# बारामतीसाठी आनंदाची बातमी, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत फडणवीस सरकारचे ३ मोठे निर्णय...

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मंत्रालयात पार पडली. यावेळी पालघर जिल्ह्यातील देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी २ हजार ५९९ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चाला मंजुरी देण्यात आली. तर जनाई शिरसाई उपसा सिंचन योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रुपांतरण करण्याच्या कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण नियमांत २०१९ मध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ बैठकीत कोणकोणते निर्णय?

१) देहरजी मध्यम पाटबंधारे प्रकल्प, ता. विक्रमगड, जि. पालघरसाठी २ हजार ५९९ कोटी रुपयांच्या सुधारित खर्चाला मंजुरी. - प्रकल्पातून ६९.४२ दलघमी पाणीसाठा वसई-विरार महापालिकेच्या पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित (जलसंपदा विभाग)

२) जनाई शिरसाई उपसा सिंचन योजना ता. दौंड, बारामती आणि पुरंदर जि. पुणे योजनेच्या कालव्यांना बंदिस्त नलिका वितरण प्रणालीत रुपांतरण करण्याच्या कामासाठी विस्तार व सुधारणा अंतर्गत ४३८.४८ कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता दिली आहे.

# दोन दुचाकींची एकमेकांना धडक, भीषण अपघातात एकुलता एक लेक गेला

**बारामती :** बारामती तालुक्यात झालेल्या भीषण अपघातात एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. होळ येथील नझीर जावेद पठाण (वय, १८) याचा शिरवळ नजीक शिंदेवाडी - भोर रस्त्यावर दोन दुचाकी एकमेकांना समोरासमोर धडकून झालेल्या अपघातात मृत्यू झाला. याच अपघातात दुसऱ्या तरुणाचाही मृत्यू झाला. तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. नझीर जावेद पठाण आणि सचिन बळीराम मडावी (वय, २२ रा. कुरडी जि. गडचिरोली) याचाही अपघातात मृत्यू झाला आहे. तर विश्वजित विठ्ठल खोमणे (वय १९ रा. मुरूम ता. बारामती) वैभव नितीन भिसे (वय १९ रा. होळ ता. बारामती) आणि अमोल नामदेव लिगसे (वय २० वर्ष रा. लक्ष्मीनगर जालना) हे तिघे अपघातात गंभीर जखमी झाले आहेत. होळ - साळोबा वस्ती येथील तीनही तरुण शिरवळ - शिंदेवाडी फाटावरून बारामतीकडे येत होते. त्यावेळी हा अपघात झाला. ९ फेब्रुवारी, रविवारी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.जखमींवर शिरवळ येथील जोगळेकर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नजीर पठाण हा सोमेश्वरनगर येथील मु. सा. काकडे महाविद्यालयात इयत्ता अकरावीत शिकत होता. एकुलता एक मुलगा गेल्याने होळ - मुरूम गावावर शोककळा पसरली आहे.दरम्यान, बारामतीमध्ये याआधी तरुणाला मारहाण केल्याची घटना घडली होती. गाडी आडवी लावत अडवून तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी शहर पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला. आनंद शाम सुर्यवंशी, विक्रांत गोरख गायकवाड आणि रुद्र नवनाथ सुर्यवंशी (सर्व रा. नेवसे रोड, चिमणशहामळा, बारामती) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावं आहेत. याबाबत विनोद गणेश जाधव (रा. तांदूळवाडी ढेरेवस्ती, बारामती) या युवकाने फिर्याद दिली. रविवारी (दि. ९) रोजी सायंकाळी साडे सात वाजता भिगवण चौकात ही घटना घडली.फिर्यादीला विक्रांत गायकवाड आणि रुद्र सुर्यवंशी, यांनी गाडी आडवी लावून अडवत शिवीगाळ, दमदाटी केली. तसंच आनंद सुर्यवशी याने शेजारी पडलेला दगड हातात घेत, हातातील कड्याने फिर्यादीच्या डोक्याला, हाताला, उजव्या डोळ्यावर दुखापत केली असल्याचं फिर्यादीत म्हटलं आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अजित पवार म्हणाले, स्वत:च्या मुलाला निवडून आणता आलं नाही, अमित ठाकरे यांचं सडेतोड प्रत्युत्तर



**मुंबई** : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर शंका उपस्थित केली. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा निकाल हा अनपेक्षित होता, अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली. त्यांच्या या भूमिकेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल प्रतिक्रिया दिली होती. राज ठाकरे कोण? त्यांनी निवडणूक निकालावर वक्तव्य केलं त्याच्याशी आम्हाला काही देणंघेणं नाही. आम्हाला जनतेने निवडून दिलं आहे. आम्हाला लोकसभेच्या निवडणुकीत ज्यावेळेस १७ जागाच मिळाल्या, त्यावेळेस आम्ही रडत बसलो नाहीत की, आमची एक जागा आली आम्ही काय करायचं?अरे तुम्हाला तुमच्या मुलाला निवडून आणता येत नाही आणि तुम्ही आमच्यावर गप्पा मारता, असा टोला अजित पवार यांनी राज ठाकरेंना लगावला होता. यानंतर आता राज ठाकरे यांचे पुत्र तथा मनसे नेते अमित ठाकरे यांनी अजित पवार यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिलं आहे. दादरच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर आज कामगार नगर प्रीमियर लीग - २०२५ चे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी अमित ठाकरे कार्यक्रमात उपस्थित होते. यावेळी माध्यमांना प्रतिक्रिया देत असताना अमित ठाकरे यांना पत्रकारांनी अजित पवार यांनी केलेल्या टीकेबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर अमित ठाकरे यांनी रोखठोक भूमिका मांडली.अजित पवार यांना प्रत्युत्तर द्यायला मी अजून खूप लहान आहे. राज ठाकरेच त्यांना उत्तर देतील. पण एक सांगतो, निवडणुकीत हरलो असलो तरी खचलो नाही. या निवडणुकीत खूप काही शिकलो. मला इतर गोष्टींचा फरक पडत नाही. माझ्या पहिल्या निवडणुकीत नाही तर शेवटच्या निवडणुकीत मला जज करा, असा टोला अमित ठाकरे यांनी अजित पवार यांना लगावला.राज ठाकरे २०१७ मध्ये सर्वच नेत्यांना भेटले होते. त्यांनी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनाही सांगितलं होतं की, तुमचा ईव्हीएमवर विश्वास नसेल तर बहिष्कार टाका. ईव्हीएम आलं म्हणजे प्रोग्रामिंग आलं आणि त्यामध्ये तुम्ही काहीही फसवणूक करू शकता. त्यामुळे या निवडणुकीत नाही, तर पुढच्या निवडणुकीत बॅलेट पेपरवर निवडणूक होईल ही आशा आहे. बॅलेट पेपर हे बेटर आहे. बॅलेट पेपरवर निवडणूक घ्या. आम्ही याच मतांवर ठाम आहोत. निवडणुकांवर बहिष्कार टाकायचा नसेल तर हेच रिझल्ट तुम्हाला दिसतील. ईव्हीएमवर किती विश्वास आहे माहिती नाही. माझ्याकडे पुरावा नाही. राज ठाकरे याच्यावर स्पष्ट बोलतील. निकाल जो येतोय, तो अनपेक्षित असाच आहे, अशी प्रतिक्रिया अमित ठाकरे यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालावर दिली.

## नेत्यांनी सर्वांची कामे करावीत; नितीन गडकरी यांच्या स्वपक्षाला कानपिचक्या, रोख नेमका कुणावर?



**पुणे** : सत्ता मिळाल्यानंतर लोकप्रतिनिधी मंत्री बनतो. मंत्री झाल्यानंतर तो सर्वांचा असतो. त्यामुळे सर्वांची समाजपयोगी कामे करायला हवीत, अशा शब्दांत केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी स्वपक्षाला कानपिचक्या दिल्या. स्वपक्षातील लोकांचे समाजपयोगी काम नसले, तर ते करायचे किंवा नाही, याचा विचारदेखील संबंधित मंत्राने करायला हवा, असेही त्यांनी या वेळी नमूद केले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय आमदार संमेलनाच्या वतीने देशभरातील आमदारांसाठी क्षमतावृद्धी कार्यक्रमात केंद्रीयमंत्री गडकरी दूरदृश्यप्रणालीद्वारे बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उत्तर प्रदेश विधानसभेचे सभापती सतीश महाना, लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन आदी या वेळी उपस्थित होते. गडकरी म्हणाले, स्वपक्षातील लोकांची समाजपयोगी कामे नसल्यास ती करायची किंवा कसे, याचा विचार व्हायला हवा. तरच नकारात्मक राजकारणातून आपण बाहेर येऊ. समाजात गुणात्मक बदल करायचा असल्यास लोकप्रतिनिधींच्या दृष्टीकोनात बदल होणे आवश्यक आहे. समाजपयोगी, शाश्वत विकासाची कामे केल्यास जात, धर्म या भिंती ओलांडून राजकारण पुढे जाईल.कायदे बनविणे आणि राज्याला आर्थिकदृष्टीने चालना देणे ही विधिमंडळाची प्राधान्याची कामे आहेत. मात्र, या दोन्ही विषयांवरील चर्चेत आमदार सहभागी होत नाहीत आणि त्यात रुचीदेखील दाखवित नाहीत, ही खेदाची बाब आहे. लग्नसोहळे, अंत्यविधी इत्यादींना उपस्थिती लावणे हे लोकप्रतिनिधीचे जनसंपर्काच्या दृष्टीने कामच असते. मात्र, जनसंपर्कासोबतच विधिमंडळ कामकाजाची माहिती, संसदीय आयुधांचा वापर करून मतदारसंघातील समस्या या सभागृहात मांडणेही आवश्यक आहे. समाजातील सहिष्णुता कमी होत चालली आहे. मात्र, राजकारणात वावरत असताना टीका, शिव्या खाण्याची तयारी हवी, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## कामावर जाताना अपघात, भरधाव वेगात डंपरने तीन मजुरांना दुचाकीसह फरफटत नेलं, एकाचा जागीच मृत्यू...

**धुळे:** धुळे तालुक्यातील वरखेडी-आर्णी रस्त्यावर वरखेडी शिवारात भीषण अपघात झाल्याची माहिती आहे. धुळे-नरडाणा रेल्वे मार्गाच्या कामासाठी वापरला जाणारा डंपर आणि दुचाकी यांच्यात जोरदार धडक होऊन हा भीषण अपघात झाला. या अपघातात एका टाइल्स फिटिंग मजुराचा जागीच मृत्यू झाला आहे. तर, अन्य दोन जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, धुळे-नरडाणा रेल्वे मार्गाचे काम सुरू आहे. यासाठी या भागात मोठ्या प्रमाणात डंपर वाहतूक सुरू आहे. आज मंगळवारी (११ फेब्रुवारी) सकाळी वरखेडी गावातून आंबोडे येथे कामावर जाणाऱ्या तीन मजुरांच्या दुचाकीला याच वाहतूक करणाऱ्या डंपरने भरधाव वेगाने धडक दिली. अपघात इतका भीषण होता की यामध्ये दुचाकीचा पूर्णपणे चक्काचूर झाला होता. प्रत्यक्षदर्शीच्या मते, डंपरने दुचाकीला अक्षरशः फरफटत दुरपर्यंत नेलं आणि नंतर तो डंपर थांबला. डंपरने फरफटत नेल्याने दुचाकीवरील तिघांनाही मोठी दुखापत झाली. यामध्ये एका मजुराचा जागीच मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले आहेत. या दुर्घटनेत अनिल कुंभार (टाइल्स फिटिंग मजूर) यांचा जागीच मृत्यू झाला. तसेच, सोपान भरत पाटील आणि करण शामराव भिल हे गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.या घटनेची माहिती मिळताच धुळे तालुका पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली आणि अपघातातील डंपर जप्त केला आहे. या अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी सध्या तपास सुरू असून, चालकाच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.



धुळे-मनमाड-इंदूर रेल्वे मार्गाच्या कामासाठी मोठ्या प्रमाणावर अवजड वाहतूक सुरू आहे. मात्र, या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजना पुरेशा प्रमाणात केल्या जात नाहीत का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रशासनाने यावर लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक व मजुरांनी केली आहे.

# पाकिस्तानी अभिनेत्रीच्या सिनेमाचा भारतात बोलबाला! सनम तेरी कसम ९ वर्षांनी चर्चेत; किती झाली कमाई?

**मुंबई:** सध्या बॉक्स ऑफिसवर नव्याने रीलिज झालेल्या चित्रपटांची नव्हे, तर ९ वर्षांपूर्वीच्या आता रीरीलिज झालेल्या सिनेमाची चर्चा रंगली आहे. हा सिनेमा म्हणजे सनम तेरी कसम, जो अलीकडेच ७ फेब्रुवारी रोजी पुन्हा एकदा रीलिज करण्यात आला. २०१६ मध्ये जेव्हा हा चित्रपट रीलिज झालेला, तेव्हा बॉक्स ऑफिसवर म्हणावी तशी कमाई झाली नव्हती. आता रीरीलिजनंतर मात्र सनम तेरी कसमची दणक्यात कमाई सुरू आहे. अवघ्या ४ दिवसात या चित्रपटाने २२ कोटींहून अधिक गल्ला कमावला. राधिका राव आणि विनय सप्रू यांनी दिग्दर्शित केलेल्या या रोमँटिक सिनेमाने रीरीलिजच्या पहिल्या दिवशी ५.१४ कोटी




रुपये कमावले होते. आता चार दिवसांनी ही कमाई २२.०९ कोटी रुपये झाली आहे. जाणून घ्या या चित्रपटाची प्रत्येक दिवसाची किती झाली आहे कमाई?

सनम तेरी कसमची प्रत्येक दिवसाची कमाई
७ फेब्रुवारी, पहिला दिवस- ५.१४ कोटी
८ फेब्रुवारी, दुसरा दिवस- ६.२२ कोटी
९ फेब्रुवारी, तिसरा दिवस- ७.२१ कोटी
१० फेब्रुवारी, चौथा दिवस- ३.५२ कोटी
एकूण कमाई- २२.०९ कोटी रुपये

सनम तेरी कसमने सोमवारी १० फेब्रुवारी रोजी ३.५२ कोटीचा आकडा गाठला, तर दुसरीकडे अलीकडेच रीलिज झालेल्या लव्हयापा आणि बॅडॲस रवीकुमार या चित्रपटांनी मात्र अनुक्रमे ५५ लाख रुपये आणि ६० लाख रुपयांची कमाई केली आहे. त्यामुळे रीरीलिज झालेला हा सिनेमा त्यांच्यावर भारी पडला, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ने ही आकडेवारी दिली आहे. सनम तेरी कसम या ट्रॅजिक लव्ह स्टोरीतील इंदर आणि सरू या पात्रांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले. या भूमिका अभिनेता हर्षवर्धन राणे आणि पाकिस्तानी अभिनेत्री मावरा होकेन यांनी साकारल्या. दीपक मुकूट यांची निर्मिती असणाऱ्या सनम तेरी कसमने २०१६ मध्ये बॉक्स ऑफिसवर विशेष कमाई जरी केली नसली, तरी त्यानंतर इंटरनेटवर या सिनेमाने प्रचंड प्रेम मिळवले. यातील गाणी आणि संवाद हिट ठरले आणि परिणामी पुन्हा रीलिज झाल्यानंतर सिनेमाने चांगला फायदा मिळवला आहे. २०१६ मध्ये या चित्रपटाने जवळपास ९ कोटींची कमाई केली होती, आता चार दिवसात ही कमाई २२ कोटींच्या पलीकडे गेली आहे

# प्रामाणिकपणा!



मी तेव्हा सहावी-सातवीत असेन. आईसोबत एका वाण्याच्या दुकानात गेले होते. त्या वयात माझे लक्ष दुकानातील रंगीबेरंगी चॉकलेटकडे, आकर्षक वेस्टनातील वस्तूंकडे, काचेच्या बरणीत ठेवलेल्या खाद्यपदार्थांकडे होते.

आईला साखर विकत घ्यायची होती. त्या दुकानदाराने आईच्या हातात एक दहाची, एक पन्नासची नोट आणि साखरेचा पुडा दिला. त्याबरोबर आई म्हणाली की, मी तुम्हाला पन्नासची नोट दिली, तर तुम्ही मला फक्त दहा रुपये परत द्यायला हवे. असे बोलून आईने पन्नासची नोट त्याच्यासमोर धरली. ते पाहून दुकानदार आईला म्हणाला की, तिने त्याला शंभरची नोट दिली होती. त्यामुळे त्याला साठ रुपये परत करणे भाग आहे. मग दोघेही आपापली बाजू मांडू लागले. आई म्हणाली की, तिच्या पर्समध्ये गेले चार-पाच दिवस ती एकच पन्नासची नोट होती, तर ती शंभरची नोट कशी काय देणार? दुकानदार म्हणाला की, तुम्ही शंभराची नोट दिल्यावर मी पन्नासचे सुट्टे कसे देणार? बराच वेळ चाललेला हा संवाद मी मन लावून ऐकू लागले. दुकानातील वस्तू पाहण्यात गुंतल्यामुळे आईने कोणती नोट दिली, ते मी पाहिले नाही. मग त्या पन्नासच्या नोटेचं काय झालं मला आठवत नाही. पण त्यादिवशी एक गोष्ट मी आपोआप शिकले ती म्हणजे प्रामाणिकपणा! काही गोष्टी शिकवल्या जात नाहीत, त्या आपण शिकत जातो. त्यातीलच एक महत्त्वाचा गुण म्हणजे प्रामाणिकपणा!

# छावासाठी विकी कौशलनं घेतलंय तब्बल इतक्या कोटींचं मानधन, तर अक्षय खन्नाला मिळाले फक्त...

विकी कौशल आणि रश्मिका मंदाना यांच्या छावा सिनेमची चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. यानंतर वादाला तोंड फुटलं होतं. मात्र आता या वादावर पडदा पडला असून प्रेक्षकांना आता सिनेमाची उत्सुकता आहे. दरम्यान, आता सिनेमातील कलाकारांच्या मानधनाची चर्चा सुरू आहे. गेल्या चार वर्षापासून छावा सिनेमावर काम सुरू होतं. आता बिग बजेट सिनेमा कसा असेल, याबद्दल उत्सुकता आहे. या सिनेमात लोकप्रिय कलाकारांची



फौज असून यातल्या कलाकारांनी कोट्यवधींचं मानधन घेतलं हे. विकी कौशल या सिनेमात छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत असून त्यानं १० कोटींचं मानधन घेतल्याचं म्हटलं जात आहे. तर महाराणी येसूबाईच्या भूमिकेत असलेल्या रश्मिकानं सिनेमासाठी चार कोटींचं मानधन आकारलं आहे. औरंगजेबाच्या भूमिकेत असलेल्या अक्षय खन्नानं दोन कोटींचं मानधन घेतलंय.अभिनेते आशुतोष राणा यांनी सिनेमात सरसेनापती हंबीरराव मोहितेंची भूमिका साकारली आहे. या सिनेमासाठी त्यांनी ८० लाखांची फी आकारली आहे.अभिनेत्री दिव्या दत्ता देखील सिनेमात महत्त्वाच्या भूमिकेत आहे. तिनं सिनेमासाठी ४५लाखांचं मानधन घेतलं आहे.लक्ष्मण उतेकर यांनी या सिनेमाचं दिग्दर्शक केलं असून, या सिनेमाचं बजेट १३० कोटींच्या जवळपास आहे. तर सिनेमाच्या आधीच ॲडव्हान्स बुकींग च्या माध्यमातून पाच कोटींच्या जवळपास कमाई झाल्याचं म्हटलं जात आहे.तर छत्रपती संभाजी महाराज यांच्या आयुष्यावर बेतलेल्या ङ्गछावाफ चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये छत्रपती संभाजी महाराज लेझीम खेळताना दाखवण्यात आले होते. यावर अनेक शिवप्रेमी संघटनांनी आक्षेप घेतला होता. यानंतर सिनेमावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, वाढता वाद लक्षात घेता निर्मात्यांनी ते सीन काढून टाकण्याचा निर्णय घेतला.१४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणाऱ्या या सिनेमासाठी विकी कौशल आणि टीम जोरदार प्रमोशन करताना दिसतेय.

# भाजपकडे एक इन्स्ट्रूमेंट आहे, यामुळेच मोठा विजय...

## दिल्लीतील महाविजयानंतर भाजपच्या मंत्र्याचे सूचक विधान

**पुणे :** २७ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर भाजपचे दिल्लीतील सत्तास्वप्न पूर्णत्वास आले आहे. भाजपने दिल्ली विधानसभा निवडणुकीत महाविजय मिळवला आहे. ४८ जागांवर भाजपने विजय मिळवला आहे. तर आपला केवळ २२ जागांवर समाधान मानावे लागले आहे. तर काँग्रेसचा यंदाही सुपडासाफ झाला आहे. यावर राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यातच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही भाजपच्या दिल्लीतील महाविजयावर प्रतिक्रिया दिली आहे. भाजपकडे एक इन्स्ट्रूमेंट आहे, त्यामुळे मोठा विजय मिळतो असे मोठे विधान बावनकुळे यांनी केले आहे. बावनकुळे म्हणाले, भाजपला ऐतिहासिक विजय मिळाला आहे. ७० पैकी ४८ सीट मिळाल्या आहेत. दिल्लीकरांनी भाजपवर विश्वास या निकालामध्ये प्रतिबिंबित होत आहे. केजरीवाल आणि काँग्रेसच्या गैरकारभारामुळे २७ वर्षांनंतर भाजपला हा विजय मिळाला आहे. २७ वर्षांत जो विकास झाला नाही त्यासाठी मोदींच्या नेतृत्वात भाजप सरकार न्याय देणार आहे. तर मत विभाजनाचा मुद्द्यावर प्रश्न विचारला असता बावनकुळेंनी हा दावा खोडून काढला आहे. मतविभाजन झाले यात काही तथ्य नाही. महाराष्ट्रात आघाडीवाले एकत्र होते तरी काही फायदा झाला नाही. आमचे संघटन काम करत आहेत, योग्य उमेदवार आणि निवडणुकीचं कौशल्य आहे, हे भाजपकडे इन्स्ट्रूमेंट आहे, त्यामुळे भाजपला मोठा विजय मिळतो असेही बावनकुळेंनी नमूद केले.तर काँग्रेसवर टीकास्त्र डागत बावनकुळे म्हणाले, काँग्रेसने आता आत्मचिंतन केले पाहिजे. उद्यापासून मशीन खराब झाली म्हणू नये. राहुल गांधींना महाराष्ट्राचा निकाल पचवत नाहीये. काँग्रेस पार्टी नीतिमत्तेमुळे हरलेली आहे. राहुल गांधी हे विकसित भारताच्या पद्धतीला निगेटिव्ह पद्धतीने घेत आहेत, त्यामुळे जनता राहुल गांधींना दूर करत आहे. काँग्रेसचे ना मॉडेल आहे, ना नीतिमत्ता आहे. २०४७ पर्यंत काँग्रेस पार्टी दिसणार नाही. मोदींनी विकसित भारत दाखवला आहे.आप-काँग्रेसच्या राजकारणावर बोट ठेवत चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, काँग्रेस आणि आपची जर युती झाली असती तर भाजपला ७० पैकी ७० जागा मिळाल्या असत्या. काँग्रेससोबत आप गेली असती तर एकही जागा जिंकता आली नसती. कारण काँग्रेस पार्टी एक असं ग्रहण आहे की, ज्यामुळे आप पार्टी संपूर्ण डुबली असती. काँग्रेसला सोबत न घेतल्याने आप थोडीफार वाचली आहे, अशी घणाघाती टीकाही बावनकुळेंनी केली आहे.

# बटलरही झाला रोहितचा चाहता, हिटमॅनचे केले भरभरुन कौतुक



**कटक:** २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीला सुरुवात होण्यापूर्वी भारत आणि इंग्लंडमध्ये तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. मालिकेतील दोन सामने खेळले गेले आहेत. दोन्ही सामने जिंकण्यात भारत यशस्वी झाला. दुसरा सामना ९ फेब्रुवारी रोजी कटक येथील बाराबती स्टेडियमवर खेळवण्यात आला. या सामन्यात रोहित शर्माने शानदार कर्णधारपदाची खेळी केली. भारताने दुसरा एकदिवसीय सामना ४ विकेट्सने जिंकला. इंग्लंडच्या पराभवानंतर कर्णधार जोस बटलरने यावर प्रतिक्रिया दिली. त्याने कबूल केले की,त्याच्या संघाने अनेक गोष्टी योग्य केल्या, परंतु त्यांना असा खेळाडू सापडला नाही जो मोठी खेळी खेळू शकेल आणि धावसंख्या ३५० पर्यंत नेऊ शकेल. त्याने रोहित शर्माचे कौतुकही केले आणि त्याच्या संघाने कुठे चूक केली हे सांगितले. सामन्यानंतर जोस बटलर म्हणाला, मला वाटते की आम्ही बऱ्याच गोष्टी चांगल्या केल्या. फलंदाजी करताना आम्ही चांगल्या स्थितीत होतो. आम्हाला अशा खेळाडूची गरज होती जो धावसंख्या ३५० पर्यंत नेऊ शकेल.भारतीय कर्णधारपदाचे कौतुक करताना तो पुढे म्हणाला, याचे श्रेय रोहितला जाते, तो खूप चांगली फलंदाजी करतो. तो काही वर्षांपासून एकदिवसीय क्रिकेटमध्ये असाच खेळत आहे. जोस बटलरने पॉवरप्लेमध्ये उत्कृष्ट कामगिरीची कबुली दिली पण विरोधी संघानेही चांगला खेळ केला हे मान्य केले. तो म्हणाला, आम्हाला धावा बोर्डवर लावायच्या होत्या, चेंडू थोडा घसरत होता आणि विरोधी संघही चांगला खेळला. आम्ही पॉवरप्लेमध्ये चांगली कामगिरी केली, आम्हाला अशा खेळाडूची गरज होती जो डाव पुढे नेऊ शकेल आणि सुमारे ३३०-३५० चा स्कोअर बचाव करण्यायोग्य असता. आम्ही योग्य दिशेने पावले उचलत राहू, जरी निकाल येत नसले तरी, आम्हाला पुढे जात राहावे लागेल आणि सकारात्मक राहावे लागेल. इंग्लंडच्या डावात रवींद्र जडेजाने शानदार गोलंदाजी केली. त्याने त्याच्या १० षटकांच्या स्पेलमध्ये एक मेडन षटक टाकले. जडेजाने ३.५० च्या इकॉनॉमीने तीन विकेट्स घेतल्या. दरम्यान, रोहित शर्माने दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडविरुद्ध कर्णधारपदाची खेळी खेळली आणि शानदार शतक झळकावले. रोहित शर्माने ९० चेंडूत १३२.२२ च्या स्ट्राईक रेटने ११९ धावा केल्या. ज्यामध्ये १२ चौकार आणि ७ षटकारांचा समावेश होता.

# खोकून खोकून छाती दुखते? कफ कमीच होत नाही? तुपामध्ये हा मसाला टाकून रात्री खा क्षणात मिळेल आराम...

बदलत्या हवामानामुळे सर्दी-खोकला किंवा शरीरदुखीसारख्या समस्या येत असतील, तर आपण सर्वप्रथम घरातील मसाल्याच्या डब्यात पाहतो की या समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी उपाय तयार करण्यासाठी काही उपाय आहे का. असाच एक मसाला म्हणजे लवंग जो अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांपासून आराम देऊ शकतो. लवंगाचा वापर सामान्यतः पुलाव आणि चहासारख्या पदार्थांमध्ये केला जातो. परंतु, लवंगामध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात आणि म्हणूनच, लवंगाचा वापर अनेक रोगांवर उपचार करण्यासाठी देखील केला जातो. लवंगाचा असाच एक वापर म्हणजे तुपासोबत. काही आजारांमध्ये, लवंगा तुपात भाजून खाण्याचा सल्ला दिला जातो. लवंगाच्या बियांमध्ये युजेनॉल नावाचा घटक आढळतो. याशिवाय लवंगामध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळतात. हे सर्व घटक शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याचे काम करतात. यामुळे त्यांना हंगामी आजार आणि संसर्गांपासून सुरक्षित राहण्यास मदत होते. तुपात भाजलेल्या लवंगाचे आरोग्यदायी फायदे जाणून घेऊया.

**खोकल्यासाठी लवंग कसे वापरावे**

हिवाळ्यात खोकल्याचा त्रास होत असेल तर हा १ गरम मसाला तुपात तळून खा, आराम मिळेल तुपात शिजवलेल्या लवंगाचे फायदे: तुपात शिजवलेल्या लवंगाचे सेवन केल्याने हिवाळ्यात होणाऱ्या काही आरोग्य समस्यांपासून लवकर आराम मिळतो. तुपात लवंग शिजवण्याची आणि खाण्याची पद्धत जाणून घ्या. हिवाळ्यात खोकल्याचा त्रास होत असेल तर हा १ गरम मसाला तुपात तळून खा, आराम मिळेल...

**तुपात शिजवलेल्या लवंगा खाण्याचे काय फायदे आहेत?**

तुपात शिजवलेल्या लवंगाचे सेवन केल्याने छातीतील खोकला आणि कफ यापासून आराम मिळतो. लवंगामध्ये असलेले औषधी घटक खोकला-सर्दी बरा करण्याचे आणि छातीत जमा झालेला कफ साफ करण्याचे काम करतात. तुपात लवंग शिजवून खाल्ल्याने कोरडा खोकला किंवा कोरडा कफ (सुखी खांसी से राहत के नुश्खे) ची समस्या कमी होते.



सर्दी आणि नाकातून पाणी येण्यासाठी तुम्ही तुपात शिजवलेल्या लवंगाचे सेवन करू शकता. तुम्ही बाजारात मिळणारी अँटीबायोटिक औषधे घेता, पण त्यांचा पूर्ण फायदा तुम्हाला मिळावाच असे नाही.

**संसर्ग दूर करण्यासाठी फायदेशीर**

शरीरात संसर्ग झाल्यास लवंग आणि तूप सेवन केले जाते. संसर्गापासून मुक्त होण्यासाठी, काही लवंगा घ्या, त्या थोड्या तुपात मिसळा आणि तळून घ्या. आता ते चावून खा. असे केल्याने तुम्हीसंसर्गाची समस्यामला खूप फायदा होतो.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लागवडीखालील पोटखराब जमिनीची नोंद ॲग्रिस्टॅक योजनेत होणार !

## कोणतीही बाधा नाही ; शेतकऱ्यांनी फार्मर आयडी तयार करुन घ्यावा-जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीकोनातून ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकरी माहिती संच व त्यांचे शेतकरी ओळख क्रमांक (फार्मर आयडी) तयार करण्यात येत आहेत. या योजनेत शेतकऱ्यांना लागवडीखालील पोटखराब क्षेत्र समाविष्ट करता येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी तात्काळ संबंधित तलाठी व मंडळ अधिकारी यांना संपर्क साधून सातबारा वरील पोटखराब वर्ग अ क्षेत्र हे लागवडीखालील क्षेत्रात रूपांतरित करण्यासाठी विहित प्रक्रिया पार पाडून लागवडी खालील क्षेत्र वाढवण्यात येईल तरी आपण मोठ्या संख्येने फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. ॲग्रिस्टॅकमधील फार्मर आयडी हा लागवडी योग्य क्षेत्राकरिता बनविण्यात येत असल्याने ज्या शेतकऱ्यांनी पोटखराब क्षेत्र लागवडीखाली आणले परंतू साताबारावर नोंद नाही अशा प्रकरणी तलाठी व मंडळ अधिकारी यांच्यामार्फत विहित प्रक्रिया पार पाडून ई-फेरफार प्रणालीव्दारे पोटखराब वर्ग अ क्षेत्र सातबारावर लागवडीखालील क्षेत्रात रूपांतर केले जाईल. या रूपातंरित क्षेत्रामुळे ॲग्रिस्टॅकमधील फार्मर आयडीमध्ये दर्शविलेल्या लागवडीखालील क्षेत्रामध्ये आपोआप वाढ होईल. तसेच भविष्यात होणारे जमीन हस्तांतरणाचे व्यवहार देखील फार्मर आयडीशी आपोआप लिंक होणार आहेत. सर्व शेतकरी बांधवांनी फार्मर आयडी बनवत असतांना आपले कोणत्याही प्रकारे सातबारावरील क्षेत्र कमी दाखविले जाणार नाही याची दक्षता घेवून शेतकऱ्यांनी लवकरात लवकर आपला फार्मर आयडी जवळच्या जन सेवा केंद्र (सीएससी) येथे जावून तयार करून घ्यावा.

### अद्ययावतीकरण चालू राहणार

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडीमध्ये पोटखराब खालील लागवडीची जमीन अथवा ७/१२ मधील अन्य बदल दर्शविण्याची प्रक्रिया व अद्ययावतीकरण निरंतरपणे चालू राहणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सद्यस्थितीत जवळच्या जन सेवा केंद्र (सीएससी) येथे जावून फार्मर आयडी तयार करून घ्यावा.

### फार्मर आयडी नाही तर लाभ मिळणार नाही

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी आपला सातबारा आधारला लिंक करुन फार्मर आयडी तयार करुन घ्यायचा आहे. फार्मर आयडी बनवला नाही तर पीक विमा, पीक कर्ज. पीएम किसान व विविध पीक अनुदान यांचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे तात्काळ न चुकता कोणाचीही वाट न पाहता विनाविलंब शेतकऱ्यांनी आधार आयडी क्रमांक ॲग्रिस्टॅक प्रणालीवर नोंद करावी.

### योजनांच्या लाभ वितरणात येणार सुलभता

सदर ॲग्रिस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि व संलग्न विभागांना शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेताचा आधार संलग्न माहिती संच (फार्मर रजिस्ट्री) तयार करण्यात येत असून उपलब्ध आकडेवारीच्या आधारे शेतकरी बांधवांना विविध योजनांचा लाभ वितरित करण्यामध्ये सुलभता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांना वारंवार प्रमाणिकरण अर्थात ई-केवायसीची आवश्यकता राहणार नाही.

### नोंदणी करा

ॲग्रिस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी नोंदणीकरिता शेतकऱ्यांनी जवळच्या जन सेवा केंद्र (सीएससी) अथवा तलाठी, मंडळ अधिकारी अथवा तहसिलदार यांना संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी केली परीक्षा केंद्राची पाहणी



**जनसंचलन/बुलढाणा**

इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना आज बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असतांना शेगाव येथील श्री ज्ञानेश्वर मस्कुजी बुरुंगले कला व विज्ञान कनिष्ट महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्राला भेट देऊन परीक्षा प्रक्रियेची पाहणी केली. या भेटीच्या वेळी भारतीय संस्कृतीप्रमाणे प्राचार्या मीनाक्षीताई बुरुंगले व पर्यवेक्षक शिवाजी निळे यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे सत्कार केले. यावेळी आशिष वाघ उपशिक्षणाधिकारी(मा), अनिल देवकर, उपशिक्षणाधिकारी (प्रा),गटशिक्षणाधिकारी श्रद्धा वायदंडे, योगीराज फाउंडेशनचे सचिव डॉ. श्यामकुमार बुरुंगले, श्रीधर पाटील आणि सोबत इतर अधिकारी, पत्रकार, प्राध्यापक व शिक्षक उपस्थित होते. आजपासून इयत्ता बारावीची परीक्षा सुरु झाली असून राज्यभरात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. यादृष्टीने परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त परीक्षा राबविली जात आहे का याची पाहणी करण्यासाठी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी ही भेट दिली. या पाहणी दरम्यान त्यांनी राज्यात आजपासून सुरू झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षा व कॉपीमुक्त अभियानासंदर्भात माहिती दिली. याशिवाय विद्यार्थ्यांनी शांततेत परीक्षा द्यावी. तसेच परीक्षा केंद्रातील अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि पालकांनी कॉपीमुक्त अभियात सहभागी होवून सहकार्य करण्याचे आवाहन केले.

# दिव्यांग बांधव व अनाथ बालकांसह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी घेतले श्रींचे दर्शन...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याचे गृह(ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर हे आज मंगळवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी दिव्यांग बांधव तसेच अनाथ बालकांसह शेगांव येथे श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्यमंत्री डॉ.भोयर यांनी श्री गजानन महाराज संस्थानचा आढावा यावेळी घेतला. तसेच वर्धा जिल्ह्यातून आलेल्या दीडशे दिव्यांग बांधव तसेच अनाथ बालकांना दर्शन घडवून दिले. तसेच त्यांच्यासोबत महाप्रसादाचा लाभही त्यांनी घेतला. संस्थानच्या वतीने त्यांचे सपत्नीक यथोचित स्वागत सत्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा निबंधक नानासाहेब, उपशिक्षणाधिकारी(मा) आशिष वाघ, उपशिक्षणाधिकारी(प्रा) अनिल देवकर, सहायक कार्यक्रम अधिकारी मंगेश भोरसे, गटशिक्षणाधिकारी श्रद्धा वायदंडे आदी उपस्थित होते.

# गो. से. महाविद्यालयात कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह २०२४-२५ चे आयोजन संपन्न

**जनसंचलन/ खामगांव**

स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगांव व्दारा संचालित गो. से. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव येथे वाणिज्य व व्यस्थापनशास्त्र विभागाद्वारे दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी हेड हेल्ड हाय व नासकॉम यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह २०२४-२५ चे आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह चा उद्देश विद्यार्थ्यांना बँकिंग आणि कॉर्पोरेट क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे हा होता. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. डी. एस. तळवणकर प्राचार्य गो. से. महाविद्यालय, खामगाव यांच्या उपस्थितीत झाले. विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्याकरिता निपुण स्किल्स, संभाजीनगर येथील श्री. योगेश काबरा हे उपस्थित होते. व तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शक म्हणून श्री. सुमित धानोरे सिनिअर मॅनेजर हेड हेल्ड हाय आणि कु. आम्रपाली शेगोकार, कोऑर्डिनेटर हेड हेल्ड हाय हे उपस्थित होते. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह २०२४-२५ करिता गो. से. महाविद्यालयाचे १०३ आणि २० विद्यार्थी सुरजदेवी मोहता महिला महाविद्यालयाच्या उपस्थित होते. या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह चे सूत्रसंचालन प्रा. जयश्री हेडा यांनी केले. तर कार्यक्रमाचा समारोप प्रा. कु. पायल भन्साली यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. या कार्यशाळेच्या यशस्वितेकरिता विभागप्रमुख डॉ. डी. एन. व्यास, डॉ. एम. एस. गायकवाड, डॉ. जे. डी. पोरे, डॉ. ए. के. धनागरे, प्रा.




राज फाटे, प्रा. सुरज ठेंग, प्रा. संजय पाटील, डॉ. बोकड, प्रा. पानझाडे, प्रा. दांडगे, प्रा. सलमान शेख, प्रा. निंबाजी मेढे , प्रा. आटोळे, प्रा. गोमासे, प्रा. ताठे, प्रा. नितीन अग्रवाल, प्रा. अर्चना पाटील, प्रा. रोशनी शेलकर, प्रा. शुभांगी नांदोकार, प्रा. रुचिका कारंजकर, प्रा. रविना छतवानी आणि बाळू ससाणे यांनी अथक परिश्रम केले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले प्रशांत शिंदे यांचे बुलढाण्यात आकस्मिक निधन...

जनसंचलन/बुलढाणा



भारतीय सैन्य दलात श्रीनगर येथे सेवेत कार्यरत असलेल्या जवान प्रशांत शंकर शिंदे हे सुट्टीवर घरी बुलढाण्यात आल्यानंतर दिर्घ आजाराने त्यांचा मृत्यू झाला. आज दिनांक ११ फेब्रुवारी रोजी दुपारी इकबाल चौक येथील हिंदू स्मशानभूमीमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. जवान प्रशांत शिंदे हे आजारी असल्यामुळे ते दहा दिवसापासून सुट्टीवर आले होते. राजमाता चौक येथील रहिवाशी असलेले प्रशांत शिंदे हे सोळा वर्षापासून सेवेत होते. त्यांचे मोठे वडील भगवान शिंदे, वडील शंकर शिंदे, मोठा भाऊ सचिन शिंदे हे सुद्धा कार्यरत होते. प्रशांत शिंदे यांची काल अचानक शुगर वाढल्यामुळे त्यांना डॉक्टर माहिती यांच्या हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आले होते मात्र तब्येत जास्त घालावी त्यामुळे त्यांना तात्काळ औरंगाबाद येथे झालेला मात्र उपचार सुरू असतानाच काल दिनांक १० फेब्रुवारी दुपारी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी सैन्य दलातील वरिष्ठ अधिकारी व जिल्हा सैनिक अधिकारी कर्मचारी यांनी उपस्थित राहून त्यांना मानवंदना दिली.

त्यांच्या पाठीमागे पत्नी, आई, एक मुलगा व मुलगी असा मोठा परिवार आहे. सावडण्याचा कार्यक्रम उद्या दिनांक १२ फेब्रुवारी सकाळी १०.०० वाजता ठेवण्यात आला आहे.

# सुरक्षित इंटरनेट वापराविषयी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळा...

जनसंचलन/बुलढाणा

इंटरनेटच्या सुरक्षित आणि जबाबदार वापरासाठी, विशेषतः मुले, महिला आणि तरुणांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी साजरा केला जाणाऱ्या सुरक्षित इंटरनेट दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कार्यशाळा घेण्यात आली. दरवर्षीप्रमाणे फेब्रुवारीच्या दुसऱ्या मंगळवारी जगभरात सुरक्षित इंटरनेट दिवस पाळला जातो. यावर्षी ११ फेब्रुवारी रोजी ञ्टुगेदर फॉर अ बेटर इंटरनेटञ्ञ या संकल्पनेअंतर्गत हा दिवस साजरा करण्यात आला. या कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी (महसूल) समाधान गायकवाड, उपजिल्हाधिकारी अजिंक्य गोडगे, अजित जंगम, जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी सुनील खुले यांचे सह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय ११ फेब्रुवारीपासून, एक देशव्यापी जागरूकता मोहीम सुरु करत आहे. केंद्र सरकारच्या माहिती सुरक्षा आणि शिक्षण जागरुकता प्रकल्पांतर्गत आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इंटरनेट वापरकर्त्यां अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुरक्षित ऑनलाइन पद्धती, सायबर स्वच्छता, प्रमुख सायबर धोके, आणि इंटरनेट स्ट्रॅटेजीज याबाबत माहिती देण्यात आली. यासह इंटरनेटचे फायदे व तोटे, सायबर फ्रॉड, फिशिंग, स्मिशिंग, डिजिटल अरेस्ट, ऑनलाईन फसवणुकीपासून बचाव आदी महत्त्वपूर्ण माहिती सुनील खुले यांनी या कार्यशाळेत दिली. जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी सुनील खुले यांनी यावेळी सादरीकरण करुन सुरक्षित इंटरनेट वापराबाबत माहिती दिली.

# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द करा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

## दहावी, बारावी परीक्षेच्या तयारीचा घेतला आढावा

## बुलढाण्यात बारावीच्या ३४,६३५ विद्यार्थ्यांची परीक्षा ; ११६ परीक्षा केंद्र



फाईल फोटो

जनसंचलन/बुलढाणा

दहावी बारावी परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारी बाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री उपस्थित होते.तसेच बुलढाण्यातून प्र.जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी आदी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. इयत्ता बारावीची परीक्षा आजपासून १८ मार्चपर्यंत कालावधीत ३,३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे. दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५,१३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली. कॉपीमुक्त परीक्षेची अंमलबजावणी यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत याची खबरदारी घ्यावी , भरारी पथकाव्दारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षीत आहे, अशा सूचना दिल्या. विशेष बैठ्या पथकांची नियुक्ती होणार सर्व परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करण्यात यावी, बैठया पथकाने परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास परिक्षा केंद्रावर पोहोचावे व परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत नियंत्रण ठेवावे,संवेदनशील केंद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिका-यांची बैठ्या पथकात नेमणूक करावी. असेही त्यांनी सांगितले. संवेदनशील केंद्रावर ड्रोनची नजर संवेदनशील परिक्षा केद्रांवर ड्रोन कॅमेराव्दारे आणि व्हिडीओ कॅमेराव्दारे पूर्णवेळ निगराणी करावी, सर्व तालुक्यातील परिक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठे पथके, ड्रोन व व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत यावर निगराणी ठेवण्याकरिता जिल्हाधिका-यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचना दिल्या.

# मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत शिल्पनिदेशक पदाची भरती

जनसंचलन/मोताळा

सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोताळा येथे ठोक मानधनावर निदेशक पदासाठी अर्ज मागविण्यात आले आहे. इच्छुक अर्हताधारक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या मुळ प्रतिसह स्वखर्चाने दि. १७ फेब्रुवारी रोजी उपस्थित राहावे, असे आवाहन सेवागिरी बाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाचे प्राचार्य एस.डी.गगावणे यांनी केले आहे. आयएमसी अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी निव्वळ तात्पुरत्या मानधानावर १४ हजार रुपये प्रतिमाह प्रमाणे नव्याने संलग्नता प्राप्त झालेल्या व्यवसायाच्या रिक्त असलेले निदेशक पदे भरावयाची आहेत. इच्छुक अर्हताधारक उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक प्रमाणपत्राच्या मुळ प्रतिसह स्वखर्चाने दि. १७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता मुलाखतीसाठी सेवागिरी बाबा शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोताळा मलकापुर रोड, जि. बुलढाणा येथे उपस्थित राहावे. सबंधित शाखेतील अभियांत्रिकी पदवी, पदविका, आयटीआय पास व अनुभव असल्यास प्राधान्य राहील. पदासंदर्भातील अटीशर्ती व सविस्तर माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.






दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958